e

# MAHARASHTRA ACT No. I OF 1987

## THE MAHARASHTRA RAW COTTON (PROCUREMENT, PROCESSING AND MARKETING) (RETROSPECTIVE EXTENSION OF DURATION) ACT, 1986

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक १ जानेवारी १९८७ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

एच. के. कुलकर्णी,
सह सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

# MAHARASHTRA ACT No. I OF 1987

## AN ACT TO EXTEND THE DURATION OF THE MAHARASHTRA RAW COTTON (PROCUREMENT, PROCESSING AND MARKETING) ACT, 1971, WITH RETROSPECTIVE EFFECT.

[ राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक २ जानेवारी १९८७ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला. ]

## सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १.

**महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) अधिनियम, १९७१ याच्या मुदतीत भूतलक्षी प्रभावाने वाढ करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते;

१९७१ चा महाराष्ट्र ४७. **आणि ज्याअर्थी,** 'महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) अधिनियम, १९७१' याच्या मुदतीत यात, यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी भूतलक्षी प्रभावाने वाढ करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक आहे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री झाली होती; आणि म्हणून त्यांनी १६ सप्टेंबर १९८६ रोजी, 'महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) (भूतलक्षी प्रभावाने मुदत वाढविणे) अध्यादेश, १९८६,' प्रख्यापित केला होता; १९८६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. ४.

आणि ज्याअर्थी, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे, त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सदतिसाव्या वर्षी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ. १. (१) या अधिनियमास, 'महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) (भूतलक्षी प्रभावाने मुदत वाढविणे) अधिनियम, १९८६' असे म्हणता येईल.

(२) तो, दिनांक ३० जून १९८६ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७ याच्या कलम १ ची सुधारणा. २. 'महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) अधिनियम, १९७१' (यात यापुढे ज्याचा "मुख्य अधिनियम" असा निर्देश करण्यात आला आहे) याच्या कलम १ मधील पोट-कलम (४) मध्ये "१९८६" या आकड्याऐवजी "१९८९" हा आकडा दाखल करण्यात येईल. १९७१ चा महाराष्ट्र ४७.

व्यावृत्ती. ३. या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे, कोणतीही व्यक्ती, या अधिनियमाद्वारे मुख्य अधिनियमाच्या मुदतीत भूतलक्षी प्रभावाने केलेली वाढीव मुदत वगळता, १ जुलै १९८६ रोजी प्रारंभ होणाऱ्या व १६ सप्टेंबर १९८६ रोजी समाप्त होणाऱ्या कालावधीत, तिने केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही कृतीबद्दल, अशी कृती किंवा अकृती हा अपराध नसेल तर, कोणत्याही अपराधाबद्दल दोषासिद्धीस पात्र असणार नाही.

शंका दूर करणे. ४. शंका दूर करण्याकरिता याद्वारे असे घोषित करण्यात येते की, दिनांक ३० जून १९८६ नंतर समाप्त होणाऱ्या मुख्य अधिनियमाची मुदत त्या दिनांकापासून दिनांक ३० जून १९८९ हा दिनांक धरून त्या दिनांकापर्यंत या अधिनियमाद्वारे भूतलक्षी प्रभावाने वाढविल्यामुळे तो कोणत्याही वेळी समाप्त झाला होता असे कधीच मानले जाणार नाही व या अधिनियमाद्वारे सुधारण्यात आलेल्या त्या अधिनियमाच्या सर्व तरतुदी, या अधिनियमाच्या कलम ३ च्या तरतुदींच्या अधीनतेने अखंडपणे अंमलात असल्याचे मानण्यात येईल.

सन १९८६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४ चे निरसन व व्यावृत्ती. ५. (१) 'महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) (भूतलक्षी प्रभावाने मुदत वाढविणे) अध्यादेश, १९८६' हा, याद्वारे निरसित करण्यात येत आहे. १९८६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४.

(२) असे निरसन करण्यात आले असले तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा कोणतीही कारवाई ही, या अधिनियमाद्वारे सुधारण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये प्रकरणपरत्वे केलेली गोष्ट किंवा करण्यात आलेली कारवाई असल्याचे मानण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद),

**न. ब. पाटील,**
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.